

**मुंबई : केईएम रूग्णालयात एनआयसीयु वॉर्डमध्ये विशेष कक्षाचे उद्घाटन करताना आशा जैठा, सोबत इतर मान्यवर.**

# मुकुल माधव फाऊंडेशनतर्फे केईएममध्ये 'एनआयसीयु'

▶ **रत्नागिरी / प्रतिनिधी**

शैक्षणिक, सामाजिक व वैद्यकीय क्षेत्रात अनेकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवणाऱ्या मुकुल माधव फाऊंडेशनतर्फे केईएम रूग्णालयातील नवजात अतिदक्षता कक्ष (एनआयसीयु) सुरू करण्यात आला आहे. या कक्षाचे नामकरण सोनाली द लिटल स्टार्स रूम असे करण्यात आले आहे.

या कक्षाचे उद्घाटन स्पायका इलास्टीक प्रा. लि. संचालक रजनीकांत जैठा यांची पत्नी आशा जैठा यांच्याहस्ते झाले. यावेळी फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे व मुकुल माधव फाऊंडेशनचे संस्थापक प्रल्हाद छाब्रिया, फिनोलेक्स इंडस्ट्रिज लिमिटेडचे व मुकुल माधव फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रकाश छाब्रिया, मुकुल माधव फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितु छाब्रिया, केईएम रूग्णालयाचे चिकित्सा निर्देशक डॉ. के. जे. कोयाजी, बालतज्ज्ञ विभागाचे निर्देशक डॉ. ए. एन. पंडित, स्पायका इलास्टीक प्रा. लि. चे मनिष व मनिषा जैठा व मुकुल माधव फाऊंडेशनच्या विश्वस्त गायत्री छाब्रिया उपस्थित होत्या.

सोनाली द लिटल स्टार्स रूम म्हणजेच नवजात अर्भक अतिदक्षता कक्षात ६ बेड असून एक व्हेंटिलेटर, बबल, सीपीएपी, पल्स ऑक्झिमीटर, फोटोथेरपी युनिट, सिरींज पंप व वॉर्मर यांचा समावेश आहे. ज्यांची आर्थिक स्थिती सामान्य आहे अशा नागरिकांसाठी ही सुविधा आहे.